महासागर
e-mail : nagpurpost@gmail.com ● mahasagarngp@gmail.com

## संस्कार दिनानिमित्त विविध समाजोपयोगी कार्यक्रमांचे आयोजन

**नांदुरा (महासागर प्रतिनिधी):** आचार्य हरिभाऊ वेरुळकर गुरुजींचा जन्मदिवस (१६ फेब्रुवारी) म्हणजेच 'संस्कार दिन' निमित्त राष्ट्रधर्म युवा मंच राज्यभरात विविध समाजउपयोगी कार्यक्रम राबवित आहे. आरोग्य शिबिरे, रक्तदान शिबिरे, शाळा-महाविद्यालयांत सुसंस्कार अभियान आणि प्रबोधनात्मक जनजागृती कार्यक्रम यांचा यात समावेश आहे.

गेल्या अनेक वर्षांपासून श्रीगुरुदेव सेवाश्रम, नांदुरा येथे आचार्य हरिभाऊ वेरुळकर गुरुजींचा जन्मदिवस विविध समाज उपयोगी उपक्रमांच्या माध्यमातून साजरा होत असतो . यावर्षी सुद्धा विशेष कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

१६ फेब्रुवारी रोजी सकाळी ७ वाजता : रामधून , सकाळी १० वाजता भव्य रक्तदान शिबिर, श्रीगुरुदेव आश्रम नांदुरा येथे होईल व नांदुरा खुर्द येथील पंचवटी मैदान येथे सायंकाळी ६.३० वा. : भव्य सामुदायिक प्रार्थना, सायं. ७ वा : सप्त खंजेरी वादक डॉ. रामपाल धारकर यांचा प्रबोधनात्मक कार्यक्रम होणार आहे निमंत्रित मान्यवरांच्या उपस्थितीत सदर कार्यक्रम होत असून राष्ट्रधर्म युवा मंच तर्फे सर्व नागरिकांना सदर कार्यक्रमांसाठी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात येत आहे. विशेषतः रक्तदानासारख्या पवित्र कार्यात तरुणांनी उत्स्फूर्त सहभाग घ्यावा, अशी विनंती आयोजन समितीच्या वतीने करण्यात येत आहे.

# जळगाव जामोद हादरले! महापुरुषाच्या पुतळ्याची विटंबना!

## शहरात तणावपूर्ण शांतता, ठाणेदार नितीन पाटील यांनी ४ तासात आरोपीला ठोकल्या बेड्या



**जळगाव जामोद (महासागर प्रतिनिधी)** - शहरात १४ फेब्रुवारीच्या रात्री एका माथेफिरूने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्याची विटंबना केल्याची धक्कादायक घटना घडली. या घटनेमुळे शहरात तीव्र संताप व्यक्त होत असून, पोलिसांनी अवघ्या चार तासांत आरोपीला अटक केली आहे.

सध्या शहरात तणावपूर्ण शांतता असून ठिकठिकाणी कडेकोट पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, १४ फेब्रुवारी रोजी रात्री ११:३० च्या सुमारास स्थानिक डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकात वाडी खुर्द येथील राहुल विश्राम लांडे (वय ४०) याने स्मारकाची विटंबना केली. ही बाब लक्षात येताच परिसरात संतापाची लाट उसळली. हजारो भीम अनुयायी रस्त्यावर उतरले आणि आरोपीला आपल्या ताब्यात देण्याची मागणी करू लागले होते.

**चार तासांच्या आतच आरोपींच्या मुसक्या आवळल्या**

घटनेचे गांभीर्य ओळखून पोलीस उपविभागीय अधिकारी आनंद महाजन यांच्या मार्गदर्शनात ठाणेदार नितीन पाटील यांनी स्वतः तातडीन सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे आरोपीची ओळख पटवून पोलीस उपनिरीक्षक नागेश खाडे व सहकाऱ्यांनी मध्यरात्रीच आरोपीच्या मुसक्या आवळल्या. आरोपीविरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या कलम २९९, १९२ आणि १९६(१) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.या घटनेनंतर जळगाव जामोद शहरात सकाळपासूनच बाजारपेठ बंद ठेवण्यात आली होती. विविध राजकीय नेत्यांनी घटनास्थळी भेट देऊन प्रशासनाकडे सुरक्षेच्या मुद्द्यावर जाब विचारला.

"आम्ही आरोपीला अटक केली आहे. कायद्यानुसार कठोर कारवाई केली जाईल. नागरिकांनी कोणत्याही अफवांवर विश्वास ठेवू नये आणि शहरात शांतता राखावी."

– **आनंद महाजन** (उपविभागीय पोलीस अधिकारी)

---

ही घटना अत्यंत दुर्दैवी आणि निंदनीय आहे. अशा प्रवृत्तींचा वेळीच बंदोबस्त होणे गरजेचे आहे. महापुरुषांच्या स्मारकाजवळ हाय-डेफिनेशन सीसीटीव्ही कॅमेरे कायमस्वरूपी लावण्यात यावेत, जेणेकरून भविष्यात असे धाडस कोणी करणार नाही."

– **गजानन वाघ** (जिल्हाप्रमुख, शिवसेना उबाठा)"

---

"शहरातील शांतता भंग करणाऱ्यांची गय केली जाणार नाही. स्मारकाची सुरक्षा वाढवण्यात आली असून सीसीटीव्हीचे जाळे अधिक मजबूत करण्याबाबत आम्ही पावले उचलत आहोत.'

– **नितीन पाटील** ठाणेदार, जळगाव जा.

---

"केवळ अटक करून चालणार नाही, तर या प्रकरणाची सखोल चौकशी व्हावी. यामागे काही षडयंत्र आहे का, याचाही तपास व्हायला हवा. आमच्या महापुरुषांचा अपमान समाज सहन करणार नाही."

–**देवा दामोदर** तालुकाध्यक्ष, वंचित बहुजन आघाडी

---

"जळगाव जामोदची शांतता बिघडवण्याचा हा प्रयत्न आहे. प्रशासनाने स्मारकांच्या सुरक्षिततेसाठी तातडीने आधुनिक उपाययोजना कराव्यात आणि दोषीला कठोर शिक्षा होईल याची खात्री करावी."

– **सचिन देशमुख** (जिल्हाध्यक्ष, भाजप)

## विवाहितेच्या आत्महत्येप्रकरणी सासरकडील मंडळींविरुद्ध गुन्हे दाखल

### पतीला २ दिवसांची पोलीस कोठडी तर सासु, सासरा व दिर यांची न्यायालयीन कोठडीत रवानगी

**नांदुरा (महासागर प्रतिनिधी)** - सासरच्या मंडळी कडून होणाऱ्या सततच्या मानसिक शारीरिक त्रासाला कंटाळून एका २९ वर्षे विवाहित महिलेने राहत्या घरात गळफास घेऊन आपले जीवन संपवण्याची दुर्दैवी घटना १४ फेब्रुवारी सकाळी निमगाव येथे घडली होती भारती विशाल पाऊलझगडे असे मयत विवाहितेचे नाव असून

याप्रकरणी मयत विवाहितेचे वडील रामदास भगवान डवले वय ६०वर्षे रा चांगलवाडी, ता तेल्हारा जिल्हा अकोला यांनी नांदुरा पोलीस ठाण्यात दिलेल्या कैफियत मध्ये नमूद केले आहे की त्यांची मुलगी भारती हिचा विवाह पाच वर्षांपूर्वी आरोपी विशाल पाऊलझगडे याच्या सोबत झाला होता

आरोपी पती विशालचे एका महिलेसोबत विवाहबाह्य संबंध असल्याने तो पत्नी भारती हिला दारूच्या नशेत नेहमी शारीरिक व मानसिक त्रास देत असे तसेच सासरा रामदास प्रल्हाद पाऊलझगडे,सासु रत्नप्रभा रामदास पाऊलझगडे,दिर वैभव रामदास पाऊलझगडे हे माहेर वरून पाच लाख रुपयांच्या हुंड्यासाठी वेळोवेळी मागणी करून मयत भारतीला टोचून बोलून शारीरिक व मानसिक छळ करीत असत याच त्रासाला कंटाळून तिने आपले जीवन संपविले यांप्रकरणी नांदुरा पोलिसांनी पती, सासु सासरा व दिर यांच्याविरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या कलम १०८, ८०(२), ८५, ११५(२) ,३५२, ३५१(२), ३५१(३),३(५) अन्वये गुन्हे दाखल करण्यात आले असून पती सासु सासरा व दिर या चौघांना घटनेच्या दिवशी पोलिसांनी ताब्यात घेत अटक केली आहे

१५ फेब्रुवारी रोजी पती, सासु सासरा व दिर यांना मा न्यायालयासमोर हजर केले असता पतीला दोन दिवसांनी पोलीस कोठडी सुनावण्यात आली तर सासु सासरा व दिर यांची न्यायालयीन कोठडीत रवानगी करण्यात आली आहे

या हुंडाबळी प्रकरणाचा नांदुरा पोलीस सखोल तपास करीत असून आरोपींची संख्या वाढण्याचा कयास व्यक्त केला जात आहे

## लोणार पोलीस स्टेशन येथे शांतता कमिटीची बैठक

### शांतता सुव्यवस्था अबाधित ठेवा : ठाणेदार सदगीर



**लोणार (महासागर प्रतिनिधी)** - १४ फेब्रुवारी रोजी शिवजयंती उत्सव व रमजान ईद निमित्त शांतता कमिटी बैठकीचे आयोजन लोणार पोलीस स्टेशन येथे करण्यात आले. ही बैठक लोणार पोलीस स्टेशनचे ठाणेदार प्रकाश सदगीर यांनी आयोजित केली. बैठक शिवसेना जिल्हाप्रमुख प्रा.बळीराम मापारी, माजी जिल्हा परिषद सदस्य राजेश मापारी, महमूद शेठ, उपाध्यक्ष आबेद खान, डॉ. भास्कर मापारी यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडली. लोणारच्या इतिहासात नागरिकांनी नेहमीच सर्वधर्म समभाव व सलोखा राखला आहे. तसेच येथे साजरे होणारे सण व उत्सव देखील सर्व समाजातील लोक मिळून आनंदाने साजरे करत आले आहे.

यावेळी लोणार पोलीस स्टेशनचे ठाणेदार सदगीर यांनी सांगितले की येत्या आठवड्यात शहरात शिवजयंती उत्सव व पवित्र रमजान महिन्याची सुरुवात होत आहे. शिवजयंती उत्सव निमित्त मिरवणूक करण्यात येथे सर्व समाज बांधवांनी या मिरवणुकीमध्ये सामील होऊन शिवजयंती शांततेत व उत्साहात साजरी करावे व येणाऱ्या सन उत्सवात सर्व समाज बांधवानी एकत्र येऊन कायदा, सुव्यवस्था, अबाधित ठेवत व येणारे सर्व सण शांततेत पार पाळावे असे आवाहन यावेळी सदगीर यांनी केले.

शिवजयंती उत्सव व येणारे रमजान ईद निमित्त २०२६ च्या अनुषंगाने शांतता कमिटीच्या बैठकीला सदस्य राहुल मापारी, कॉंग्रेस कमिटीचे शहराध्यक्ष शेख समद शेख अहमद, शांतता कमिटीचे सदस्य हाजी एम.ए.नसीम, शिवसेना युवा तालुकाप्रमुख गजानन मापारी, गजानन जाधव शहरप्रमुख आरोग्य सभापती अ.उबेद हाजी अ. मुनाफ, नगरसेवक जमील कुरेशी, पंढरी चाटे, गुलाब सरदार, शाम राऊत , साहेबराव पवार, शुभम भगत, अशोक वारे, अंबादास इंगळे, शुभम देसाई, शेख रफिक सह यावेळी लोणार पोलीस ठाण्याच्या हद्दीतील शिवजयंती उत्सव समितीचे अध्यक्ष, सचिव, पदाधिकारी, मुस्लिम बांधव, कार्यकर्ते, शिवप्रेमी, पत्रकार उपस्थित होते.

## सत्संग आणि ईश्वर रुपी नाम चिंतनाचे चार्जर लावा, ह.भ.प. स्नेहगंगाश्रीजी यांचा उपदेश



**संग्रामपूर (महासागर प्रतिनिधी)** - आज मोबाईलचे युग आहे. मोबाईल शिवाय जीवन जगणे अशक्यप्राय झाले असून मोबाईल आपल्या जीवनाचा अविभाज्य भाग झाला आहे.. परंतु अनमोल अश्या आपल्या देह रुपी मोबाईलला चार्जिंग करण्यासाठी सत्संग आणि ईश्वर रुपी नाम चिंतनाचे चार्जर लावणे आवश्यक असून आपली मनस्थिती गंभीर ठेवा.आसे प्रतिपादन ह.भ.प.गंगाश्रीजी माई यांनी शिवपुराण कथे प्रसंगी केले.

संग्रामपूर येथील पुरातन अशा शिवमंदिर जीर्णोद्धार समितीच्या वतीने महाशिवरात्रीच्या पावन पर्वावर शिवपुराण कथेचे आयोजन करण्यात आले आहे.या कथा सोहळ्यातील चवथ्या दिवसाचे(ता.१४) विचार पुष्प गुंफताना त्या बोलत होत्या.

शिवपुराण कथेसाठी परिसरातील खेड्यापाड्यातून अलोट गर्दी होत आहे. कथा सोहळ्याचे त सुंदर असे नियोजन आयोजकांनी केले आहे.सर्वांना शिवपुराण कथा सोहळा दर्शनीय व्हावा म्हणून वैभव गायकी यांनी स्क्रीन ची व्यवस्था केली आहे ,तर कथा सोहळ्याच्या अनेक कार्य समित्या तयार केल्या असून प्रत्येक समितीचे कार्यकर्ते आपले काम चोख बजावत आहेत.

## सेवा शक्ती संघर्ष एसटी कर्मचारी संघाची बुलढाणा विभागीय कार्यकारणी जाहीर



**सुलतानपूर (महासागर प्रतिनिधी)** - भारतीय जनता पार्टी प्रणित एसटी कर्मचाऱ्यांची संघटना म्हणजेच सेवा शक्ती संघर्ष एस.टी. कर्मचारी संघ महाराष्ट्र राज्य हि आहे आणि याच संघटनेची बुलढाणा जिल्ह्याची (विभागाची ) वार्षिक सर्वसाधारण सभा व विभागीय कार्यकारणी ची निवड १४ फेब्रुवारी रोजी बुलढाणा विभाग सेवाशक्ती संघर्ष एस.टी. कर्मचारी संघाची सर्वसाधारण व विभागीय कार्यकारणी निवड बुलढाणा विभागाचे प्रमुख मार्गदर्शक आ. श्वेताताई महाले व ना. आकाश फुंडकर यांच्या अध्यक्षतेखाली व केंद्रीय कार्याध्यक्ष तसेच केंद्रीय उपाध्यक्ष दिलीपराव घोडके, महिला अध्यक्ष पद्मश्री राजे, राज्य कार्यकारणी सदस्य नामदेव पाटील, महिला प्रतिनिधी कलावती नरवाडे यांच्या उपस्थितीत निवड करण्यात आली.

त्यामध्ये प्रमुख मार्गदर्शक आ. सौ. श्वेताताई महाले पाटील, विभागीय अध्यक्ष शिवाजी आनंदे, विभागीय कार्याध्यक्ष सतीश पाटील तेजनकर, विभागीय सचिव सुनील पाटील यांची सर्वानुमते बिनविरोध निवड करण्यात आली. कार्यक्रमाचे संचालन प्रताप उबरहंडे यांनी केले तर यशस्वीतेसाठि सचिन लोखंडे, शैलेश कुटे,डी. एल.ढवळे, एन.बी.जायभाये, एस.व्ही.खार्डे, दत्ता निर्मळ यांच्यासह सर्व कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले कार्यक्रम शांततेत पार पडला.

## तालुक्यात शिवरात्री निमित्त विविध ठिकाणी महाप्रसादाचे आयोजन



**संग्रामपूर (महासागर प्रतिनिधी)** - तालुक्यात आज अनेक ठिकाणी महाशिवरात्री निमित्त शिवपुराण कथा व भागावत सप्ताह,हरि संकिर्तनाचे कार्यक्रम आयोजित करण्यात आले आसून आज १५ फेब्रुवारी रोजी तालुक्यात ज्या ज्या ठिकाणी शिव मंदिर आहेत. त्या ठिकाणी सकाळी जलाभिषेक व विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहेत.

तालुक्यात आज महाशिवरात्री निमित्त स्वामी रामभारती महाज संन्यास आश्रम चांगेफळ ,ऋणमुक्तेश्वर वरवट(बकाल), त्र्यंबकेश्वर मंदिर काकनवाडा, शिवमंदिर शिवपुराण कथा असलेल्या संग्रामपूर, पातुर्डा बु. तसेच तपस्वी श्री ठिकाणी भाविकांनी अलोट गर्दी करुन दर्शन घेतले. तर आज १६ फेब्रुवारी रोजी तालुक्यातील तपस्वी श्री शंकरगिरी महाराज पळशी (झाशी) व श्री सिद्धेश्वर संत गुलाबबाबा संस्थान काटेल (धाम) येथे हजारो भाविक भक्तासांठी महाप्रसदाचे आयोजन केले आहे. तरी भाविकांनी दर्शनाचा लाभ घेवून महाप्रसाद घ्यावा. थोड परिश्रम सुद्धा करावे. असे आवाहन आयोजन समितीने केले आहे.

## बुलडाण्यात चोरी, दीड लाखाचा मुद्देमाल लंपास

**बुलडाणा (महासागर प्रतिनिधी)** - जिल्हा मुख्यालय असलेल्या बुलढाणा शहरात चोरट्यांची आपले नेटवर्क सक्रीय करीत बाहेर गावी गेलेल्या एका फार्मासिस्ट यांचे घर फोडले. कपाटातील ७५ हजाराचे चांदी, सोन्याचे दागिणे व रोख ७५ हजार असा एकूण दीड लाखाचा मुद्देमाल लंपास केला. सदर घटना बुलढाणा शहरातील गजानन नगर क्रीडा संकूल येथे घडल्याने नागरिकांमध्ये भितीचे वातावरण पसरले आहे.

## २७ गुन्ह्यांतील "मोस्ट वॉन्टेड" पकडला



**बुलडाणा (महासागर प्रतिनिधी)** - फक्त बुलढाणा जिल्हाच नव्हे तर राज्यातील विविध जिल्ह्यात घरपोडीच्या गुन्ह्यातील एका सराईत गुन्हेगाराच्या मुसक्या आवळण्यात बुलढाणा येथील स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला यश आले. स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सुनील अंबुलकर यांच्या नेतृत्वाखालील पथकाने आरोपीला जालना येथून बेड्या ठोकत त्याच्याकडून चोरीचे सोने, एक स्कोडा कार आणि मोबाइल, असा एकूण ८ लाख २० हजार रुपयांचा मुद्देमाल हस्तगत केला. पकडण्यात आलेला आरोपीने राज्यभरात तब्बल २७ गुन्हे केले असून तो आजवर पोलिसांच्या हातावर तुरी देऊन फरार होता.

बुलढाणा जिल्ह्यातील खामगाव आणि शेगाव परिसरात गेल्या काही दिवसांपासून बंद घरांचे कुलूप तोडू चोरी होण्याच्या घटनांमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झाली होती. घरमालक बाहेरगावी गेल्याची संधी साधून अज्ञात चोरट्यांनी घराचा कडीकडा तोडून घरातील कपाटातून लाखो रुपयांचे सोन्या-चांदीचे दागिने लंपास केले होते. याप्रकरणी खामगाव शहर आणि शेगाव शहर पोलिसांच्या अभिलेखावर गुन्ह्यांची नोंद करण्यात आली होती.

पोलीस अधीक्षक नीलेश तांबे, अप्पर पोलीस अधीक्षक अमोल गायकवाड, अप्पर पोलीस अधीक्षक श्रेणिक लोढा यांच्या मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सुनील अंबुलकर यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक विकास पाटील, पोलीस अंमलदार एजाज खान, अमोल शेजोळ, विक्रांत इंगळे, अजिस परसूवाले, भीमराव वानखेडे, गणेश कोल्हे, अंकुश गुरुदेव, राहुल थारकर, तांत्रिक विश्लेषक ऋषी खंडेराव आणि चालक शिवानंद हेलगे यांच्या तपास पथकाने तपासचक्रे फिरवली. सीसीटीव्ही फुटेजचे विश्लेषण, तांत्रिक तपास आणि गोपनीय माहितीच्या आधारे माहिती काढली असता, आरोपी जालना येथील सदर बाजार परिसरात असल्याचे निष्पन्न झाले. पोलिसांनी क्षणाचाही विलंब न करता जालनास्थित सदर बाजार गाठून आरोपी संजयसिंग कृष्णासिंग भादा (वय ३० वर्षे) रा. गुरु गोविंद नगर (जालना) याच्या मुसक्या आवळल्या. यातील दुसरा आरोपी विजयसिंग कृष्णासिंग भादा (वय ४५ वर्षे) हा फरार होण्यात यशस्वी झाला. यावेळी आरोपीच्या ताब्यातून ३० ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने (किंमत ४ लाख ५० हजार रुपये), स्कोडा फोर व्हीलर (किंमत २ लाख ५० हजार रुपये) आणि मोबाइल (किंमत २० हजार रुपये), असा एकूण ८ लाख २० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. त्यामुळे खामगाव शहर आणि शेगाव शहर पोलीस यांच्या अभिलेखावर दाखल असलेल्या घरफोडीच्या दोन गुन्ह्यांची यशस्वी उकल झाली आहे. आरोपी संजयसिंग हा महाराष्ट्रातील विविध पोलीस स्टेशनमध्ये २७ गंभीर गुन्ह्यांमध्ये "मोस्ट वॉन्टेड" होता, हे विशेष!

## किन्ही महादेव येथे भाविकांची गर्दी



**खामगाव (का.प्र.)** - तालुक्यातील किन्ही येथील स्वयंभू शिवलिंग असलेले हे प्राचीन शिवमंदिर संपूर्ण जिल्ह्यात प्रसिद्ध आहे. सुमारे तीन एकर परिसरात विस्तारलेल्या या मंदिरास चारही बाजूंनी सुमारे २५ फूट उंचीचा दगडी परकोट असून, त्याला चार बुरुज आहेत. मंदिरात प्रवेशासाठी दोन मुख्य द्वार आहेत. मंदिराच्या मध्यभागी सुमारे ४० ते ५० फूट उंचीचे स्वयंभू शिवलिंग असून, हेमाडपंथी शैलीतील ही वास्तू अखंडत्वासाठी ओळखली जाते. पिंड व लिंग यामध्ये पोकळी असून त्यामध्ये सदैव पाणी साठलेले असते, हे या शिवलिंगाचे वैशिष्ट्य मानले जाते. मंदिरात कोरीव नक्षीकाम केलेले १६ खांब असून पूर्वेकडील छोट्या दरवाज्यातील छिद्रातून सूर्यकिरणे थेट शिवलिंगावर पडतात. मंदिराच्या सुमारे ५० फूट उंच कळसावर दशावतारांच्या सुंदर कोरीव मूर्ती असून, परिसरात बलीश्वर, गणपती व जगदंबा देवीची मंदिरेही आहेत. परकोटावर जाण्यासाठी सहा जिने उपलब्ध आहेत. संध्याकाळी शिखरकाव्या मंदिराच्या कळसावर चढविल्या जातात. संपूर्ण बुलडाणा जिल्ह्यात प्रसिद्ध असलेल्या या शिवमंदिर संस्थानचा अपेक्षित विकास झालेला नसल्याची भावना भाविकांतून व्यक्त होत आहे. तीर्थक्षेत्र विकास निधीतून मंदिराचा विकास करावा, तसेच पुरातत्त्व विभागाने नगारखाना, परकोट व दशावतारांच्या मूर्तींचे संवर्धन करावे, अशी मागणी भाविकांकडून होत आहे. दरम्यान, महाशिवरात्रीनिमित्त मंदिर संस्थानच्या वतीने भाविकांसाठी फराळाची व्यवस्था करण्यात आली होती.

महासागर

सोमवार दि. १६ फेब्रुवारी २०२६

खामगाव

पान ६

(बुलडाणा)

# अज्ञात वाहनाच्या धडकेत दुचाकीस्वार जखमी

**नांदुरा (महासागर प्रतिनिधी) :** मलकापूर वरुन खामगांवकडे जाणाऱ्या एका दुचाकीला अज्ञात वाहनाने जोरदार धडक दिल्याने दुचाकीस्वार जखमी झाला. सुदैवाने त्याच्या डोक्यात हेल्मेट असल्याने आणि ओम साई फाउंडेशनच्या कार्यकर्त्यांनी तातडीने घटनास्थळी येऊन त्याला उपचारासाठी दाखल केल्याने त्याचे प्राण वाचले. ही घटना खामगांव - मलकापूर राष्ट्रीय महामार्गावर नांदुरा मोताळा रोडवर असलेल्या उड्डाण पुलावर घडली. याबाबत प्राप्त माहितीनुसार मध्यप्रदेश नेपानगर येथील रहिवासी असलेला कैलास भिल वय ४० हा आपल्या दुचाकीने १२ फेब्रुवारी रोजी सायंकाळी मलकापूर वरुन खामगांव कडे जात होता. दरम्यान नांदुरा मोताळा रोडवर असलेल्या राष्ट्रीय महामार्गावरील उड्डाण पुलावर त्याच्या दुचाकीला अज्ञात वाहनाने जोरदार धडक दिल्याने कैलास भिल हा लगतच्या सर्व्हिस रोडवर जाऊन आदळला आणि त्याच्या डोक्यात असलेले हेल्मेट दूर फेकल्या गेले पण त्याच हेल्मेट मुळे डोक्याला बसणारा जबर मार वाचला. काही वेळात अनेक जन धावून आले. सदर माहिती मिळताच त्यांनी त्वरित ओम साईचे अध्यक्ष विलास निंबोळकर यांना त्वरित माहिती दिली. त्यामुळे ओम साईची रुग्णवाहीका सोबत पवन चरखे, श्रीराम राहटे, अमोल पाटील यांना घेऊन विलास निंबोळकर घटनास्थळी दाखल झाले.

## थोडक्यात

### पंढरीनाथ बोकारे यांना "जीवन गौरव पुरस्कार" जाहीर



**शेगाव (महासागर प्रतिनिधी):** स्मॉल अँड मिडीयम न्यूजपेपर असोसिएशन, महाराष्ट्र तर्फे वरोरा येथे राज्यस्तरीय पत्रकारांचे एकदिवसीय खुले अधिवेशन २१ फेब्रुवारी २०२६ रोजी आयोजित करण्यात आले आहे. या भव्य कार्यक्रमा निमित्त पत्रकारिता क्षेत्रातील उल्लेखनीय व दीर्घकालीन कार्याबद्दल नांदेड येथील ज्येष्ठ पत्रकार तथा नानक साई फाऊंडेशन चे प्रमुख पंढरीनाथ बोकारे यांना "जीवन गौरव पुरस्कार" जाहीर करण्यात आला आहे.

### माजी विद्यार्थ्यांची सभा संपन्न

**मलकापूर (महासागर प्रतिनिधी):** स्थानिक लीलाधर भोजराज चांडक विद्यालयामध्ये नगरातील माजी विद्यार्थ्यांच्या सभेचे आयोजन १३ फेब्रुवारी रोजी करण्यात आले होते. या आयोजित सभेच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे कार्यवाह डॉ.जयंत राजुरकर हे होते. तर प्रमुख उपस्थितीत डॉ.राजेंद्र दीक्षित, उपप्राचार्य निंबोळे सर, पर्यवेक्षक संजयसिंह तोमर यासह आदी प्रामुख्याने उपस्थित होते. याप्रसंगी उपस्थित मान्यवरांनी विविध क्षेत्रांत यश संपादन केलेले माजी विद्यार्थी हे विद्यालयाचे खरे गौरव असून त्यांचे बौध्दिक, सामाजिक व आर्थिक योगदान शाळेच्या प्रगतीला नवी गती देऊ शकतात. त्यामुळे त्यांनी सहकार्य करावे, असे आवाहन केले. या सभेला सन्मती जैन, डॉ. मुकेश केला, डॉ.योगेश पटणी, डॉ.राजेश झंवर, पंकज पाटील, विक्रांत सदावर्ते, प्रशांत दीपके, कार्तिक चांडक, पंकज पटेल, अमित राणे, गौरव खरे, धीरज वैष्णव, दिपक ठोसर, गजानन टापरे, विशाल मधवानी, स्वप्नील आकोटकर तसेच शाळेचे विद्यमान शिक्षक तथा माजी विद्यार्थी धर्मेंद्र त्रिवेदी, पंकज मेतकार, श्याम उप्पल, राजू सुरळकर व इतर माजी विद्यार्थी उपस्थित होते.

### शाहीर मल्हारी गवई यांना 'स्त्रीभूषण रमाई' पुरस्कार

**बुलडाणा (महासागर प्रतिनिधी):** रमाई जयंतीच्या १२८ व्या जयंती महोत्सवानिमित्त नागपूर येथे आयोजित विशेष समारंभात मौजे भादोला येथील कवी, गायक व शाहीर मल्हारी पुंजाजी गवई यांना सामाजिक कार्यातील उल्लेखनीय योगदानाबद्दल 'स्त्रीभूषण रमाई' पुरस्कार प्रदान करण्यात आला. विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा वारसा जोपासत तसेच स्त्रीभूषण रमाई आंबेडकर यांच्या जीवन कार्याचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून सामाजिक बांधिलकीतून सातत्याने कार्य करणाऱ्या मल्हारी पुंजाजी गवई यांचा 'स्त्रीभूषण रमाई आंबेडकर संस्था, नागपूर (महाराष्ट्र) रजि.' यांच्या वतीने सन्मान करण्यात आला. या कार्यक्रमास अध्यक्ष म्हणून राजकुमार वंजारी, भदंत नागदीपकर महास्थविर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक समिती (दीक्षाभूमी, नागपूर) यांचे सदस्य, करुणागिरी कल्पाथरी समिती, रायपूर (छत्तीसगड) चे संरक्षक महेंद्र मडामे, तसेच बहुजन धम्म मिशन, मुंबईचे अध्यक्ष गौतम मोरे हे प्रमुख उपस्थित होते.

### लोणार पोस्टेची प्रतिबंधात्मक कार्यवाही

**लोणार (महासागर प्रतिनिधी):** तालुक्यातील टिटवी येथील एका प्रकरणात सार्वजनिक शांतता व सुव्यवस्थेत बाधा पोहोचण्याची शक्यता निर्माण झाल्याने लोणार पोलीस ठाण्याने प्रतिबंधात्मक कारवाईचा अहवाल सादर केला. या प्रकरणात शिवाजी किसन कोकाटे वय २७ वर्षे राहणार टिटवी यांच्याविरुद्ध भारतीय नागरी सुरक्षा संहिता कलम १२६ व १३५ अंतर्गत कारवाई प्रस्तावित करण्यात आली आहे. पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार सदरील व्यक्तीने सोशल मीडियावर वादग्रस्त मजकूर प्रस्थापित केल्याने गावातील सरपंच व ग्रामसेवक तसेच नागरिकांमध्ये अस्वस्थता निर्माण झाली होती. त्या संदर्भात बुलढाणा येथील सायबर पोलीस स्टेशनकडे अर्ज प्राप्त झाल्यावर लोणार पोलीसांनी चौकशी कऊश्न प्रतिबंधात्मक कारवाईचा अहवाल तयार केला. या प्रकरणात आरोपीस भविष्यात कोणतेही प्रकारे सार्वजनिक शांतता भंग होईल असे कृत्य न करण्याचे बंधन घालण्यात येणार असून त्याच्याकडून तसेच दोन जामीनदारांकडून प्रत्येक दोन लाख रुपयाचा जामीन नामा घेण्याचा प्रस्ताव आहे. तसेच जामीनदार नातलग नसावे व ते भारतीय नागरिक असावे तसेच आरोपीवर नियंत्रण ठेवण्याची जबाबदारी राहील असे नमूद करण्यात आले आहे.

### दुचाकी लंपास, गुन्हा दाखल

**खामगाव (का.प्र.):** शहरातील रिवाइंडिंग दुकानासमोर उभी केलेली दुचाकी अज्ञात चोरट्याने १२ फेब्रुवारी रोजी दुपारी २ ते १ वाजेदरम्यान चोरून नेल्याची घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी खामगाव शहर पोलीस स्टेशन येथे अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. शेतकरी धनसिंग रामसिंग राठोड वय ५० वर्षा, ता. खामगाव यांनी बाजारात जाण्यासाठी दुचाकी क्रमांक एम. एच. २८ बीएच ०२८६ एका रिवाइंडिंग दुकानासमोर उभी केली होती. बाजारातून परतल्यानंतर दुचाकी जागेवर दिसून आली नाही. परिसरात तसेच गावात शोध घेऊनही वाहन न सापडल्याने चोरी झाल्याची तक्रार शहर पोलिसांत देण्यात आली. या तक्रारीवऊश्न शहर पोलिसांनी भारतीय न्याय संहिता कलम ३०३ (२) अन्वये शुक्रवारी सायंकाळी अज्ञात चोरट्याविरोधात गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणाचा तपास पोलीस अंमलदार सागर भगत करीत असून ई - साक्ष नोंदविण्यात आली आहे.

# जिल्हा परिषद विभागीय क्रीडा स्पर्धा व सांस्कृतिक महोत्सवाचा शानदार समारोप

## यजमान संघानेच राखले सर्वसाधारण विजेतेपद तर अमरावती उपविजेता

**बुलढाणा (महासागर प्रतिनिधी)** - स्थानीय जिल्हा क्रीडा संकुल येथे पार पडलेल्या जिल्हा परिषद विभागीय क्रीडा स्पर्धा व सांस्कृतिक महोत्सवाचा शानदार समारोप व बक्षीस समारंभ शनिवारी सायंकाळी पार पडला. गृह मैदानांचा तसेच स्थानिक प्रेक्षकांच्या भरगच्च प्रतिसादाचा पुरेपूर फायदा घेत यजमान बुलढाणा जिल्हा परिषदेने सर्वसाधारण विजेते



पदावर शिक्कामोर्तब केले. तर अमरावती जिल्हा परिषदेने सांघिक कामगिरीच्या बळावर उपविजेतेपद पटकाविले. संगीतमय वातावरण व फटाक्यांची आतिषबाजी अशा उत्साहपूर्ण वातावरणात बक्षीस वितरणाचा कार्यक्रम जल्लोषात पार पडला. बुलढाणा जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गुलाब खरात यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झालेल्या बक्षीस वितरण समारंभास आ. धीरज लिंगाडे, अतिरिक्त जिल्हाधिकारी खांदे, उपजिल्हाधिकारी शेलार, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक पांडुरंग कोल्हे मुख्य कार्यकारी अधिकारी गुलाब खरात यांच्या सुविद्यपत्नी रीपिका खरात, आयोजन समितीचे सचिव तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी आशिष पवार प्रमोद एंडोले, यवतमाळचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी आबाळे, अकोल्याचे परिहार माध्यमिक शिक्षणाधिकारी अनिल अकाळ, योजना विभागाचा शिक्षणाधिकारी डॉ. वैशाली ठग, जिल्हा जलसंधारण अधिकारी स्नेहल माने, शिवसेनेचे जिल्हाप्रमुख जालिंदर बुधवत. ॲड. शर्वरी तुपकर पाचही जिल्हा परिषदांचे जिल्हा क्रीडा समन्वयक. विविध जिल्हा परिषद खातेप्रमुख व पंचायत समितीचे गट विकास अधिकारी मंचावर प्रामुख्याने उपस्थित होते.

## ज्ञानेश्वरदादा पाटील यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना नोटबुक वाटप

**शेगाव (महासागर प्रतिनिधी)** - जिल्हा परिषद प्राथमिक व उच्च प्राथमिक शाळा चिंचोली ता. शेगाव येथे गो ग्रीन फाऊंडेशन शेगावच्या वतीने ज्ञानेश्वरदादा पाटील यांच्या हस्ते १४ फेब्रुवारी रोजी इयत्ता पहिली ते सातवीच्या विद्यार्थ्यांना नोटबुकचे वाटप करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सरपंच शिवाभाऊ पाटील, प्रमुख अतिथी म्हणून माऊली ग्रुप शेगावचे अध्यक्ष ज्ञानेश्वरदादा पाटील, सामाजिक कार्यकर्ते प्रवीण सुरोसे, पोलीस पाटील प्रदीप पाटील, सेवा निवृत्त वरिष्ठ



ऑडीटर प्रल्हादजी साबे, सेवा निवृत्त गटविकास अधिकारी श्री दिलीपजी इंगळे उपस्थित होते.

ज्ञानेश्वरदादा पाटील यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने गेल्या तीन वर्षांपासून गोग्रीन फाऊंडेशनच्या वतीने बुके आणि पुष्पगुच्छां ऐवजी ज्ञानेश्वरदादांना अभिष्टचिंतन करण्यासाठी नोटबुकांची भेट द्यावी जेणेकरून प्लॅस्टिकचा वापर होणार नाही आणि फुलांचेही निर्माल्य होणार नाही आणि हे नोटबुक मात्र विद्यार्थ्यांना वितरित केल्या जाईल ही संकल्पना राबविण्यात येत आहे.

## संत सेवालाल महाराज जयंती उत्सवात साजरी

**देऊळगाव राजा (महासागर प्रतिनिधी)**- स्थानिक बस स्टॅन्ड चौकात बंजारा समाजाचे आराध्य दैवत संत सेवालाल महाराज यांची २८६ वी जयंती बंजारा समाजाच्या वतीने मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. जयंती उत्सवा दरम्यान बंजारा समाजाच्या रूढी परंपरेनुसार नुसार संत सेवालाल महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करून त्यांना भोग( नैवेद्य) देण्यात आला.

याप्रसंगी शहरातील राजकीय तथा सामाजिक व्यक्तींनी संत सेवालाल महाराजांना फुल अर्पण करून आदरांजली वाहिली. त्यानंतर नवीनच उभारण्यात आलेल्या हरित हरितक्रांतीचे प्रणेनेते माजी मुख्यमंत्री वसंतरावजी नाईक यांच्या



पुतळ्याचे आ. मनोज कायंदे यांच्या हस्ते हार फुलअर्पण करून अनावरण करण्यात आले.

याप्रसंगी माजी नगराध्यक्ष संतोष खांडेभराड भाजपचे नेते डॉ. सुनील कायंदे नगरपरिषद माजी नगरसेवक प्रदीप वाघ, राष्ट्रवादी कॉंग्रेसचे तालुका कार्याध्यक्ष सदाशिव मुंडे शिवसेना(उबाठा)चे गोविंद झोरे अजय शिवरकर आणि इतर पक्षाचे कार्यकर्त्यांनी संत सेवालाल महाराज यांना आदरांजली वाहिली तर नंतर संत सेवालाल महाराज यांची मिरवणूक काढण्यात आली.

संत सेवालाल महाराज जयंती उत्सव पार पाडण्यासाठी एस.के.चव्हाण, शंकर राठोड, रमेश राठोड, श्रीराम राठोड, गजानन राठोड, संजय चव्हाण, दशरथ राठोड याव्यतिरिक्त इतर समाज बांधवांनी परिश्रम घेतले. जयंती उत्सवा दरम्यान पोलीस प्रशासनाने चोक बंदोबस्त ठेवला होता.

## महाशिवरात्री निमित्त खोरेश्वर महादेव मंदिरामध्ये दर्शनासाठी भाविकांची गर्दी



**देऊळगाव राजा (महासागर प्रतिनिधी):** शहरातील शिवभक्तांनी खोरेश्वर महादेव मंदिरामध्ये आज महाशिवरात्री निमित्त दर्शनासाठी अलोट गर्दी केली होती. शहराच्या लगतच असलेल्या डोंगर माळावरती हे शिव मंदिर वसलेले असून फार जुन्या काळापासून प्रचलित आहे. येथील शिवमूर्ती जमनराव चव्हाण यांना आपल्या शेतात नांगरणी करताना सापडली असल्याचे सांगितले जाते. त्यांनी हि शिव मूर्ती आपल्या शेतात असलेल्या एका वडाच्या झाडाखाली स्थापित केली असल्याचे पूर्वीपासून सांगितल्या जाते. श्रावण महिन्यामध्ये या ठिकाणी श्रावण सप्ताहाचे मंदिराच्या वतीने आयोजन करण्यात येते. श्रावण महिन्याच्या शेवटच्या सोमवारी महाप्रसादाचे वाटप केल्या जाते. यावेळी शहरातील शिवभक्त हजारोच्या संख्येने या ठिकाणी गर्दी करतात दरवर्षी होणाऱ्या श्रावण उत्सवामुळे शहरांमधील हे खोरेश्वर महादेव मंदिर सुप्रसिद्ध झाले असून शहरातील नागरिक या मंदिरामध्ये श्रद्धाभावाने दर्शनासाठी येतात. येणाऱ्या पुढील काळात मंदिराच्या वतीने अनेक सुविधा उपलब्ध करून देणार असल्याचे मंदिराच्या ट्रस्टच्या वतीने सांगण्यात आले.

**नियमित वाचा महासागर**

## महाकाल ग्रुपच्या वतीने महाशिवरात्री निमित्त महाप्रसाद

**सोनाळा (महासागर प्रतिनिधी):** महाशिवरात्रीच्या पावन पर्वानिमित्त सोनाळा बस स्थानकावर फराळ वाटप करून उत्सव मोठ्या भक्तिभावाने साजरा करण्यात आला. श्री संत सोनाजी महाराजांच्या पावन भूमी असलेल्या सोनाळा नगरीत महाकाल ग्रुपच्या वतीने सोनाळा बस स्थानक परिसरात महाशिवरात्री निमित्त विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले.

यावेळी महाकाल भक्तांनी भगवान शंकरांच्या मूर्तीचे पूजन व महाआरती केली. परिसर "हर हर महादेव"च्या जयघोषाने दुमदुमून गेला.त्यानंतर उपस्थित भाविक व प्रवाशांना फराळाचे वाटप करण्यात आले. या उपक्रमात अनेक मान्यवर,



ग्रामस्थ व शिवभक्त मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. सर्वांच्या सहकार्यामुळे कार्यक्रम उत्साहपूर्ण व भक्तिमय वातावरणात पार पडला. महाशिवरात्री निमित्त आयोजित या उपक्रमामुळे सामाजिक ऐक्य व भक्तीभाव वृद्धिंगत झाल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली. अनेक भाविकांनी अन्नदान, फळवाटप, पाणी वितरण तसेच श्रमदानाच्या माध्यमातून योगदान दिले.

यशस्वीतेसाठी गजानन शिरोळकर, शाम बोरपी, सतिश वानखडे, हर्षल खंडेलवाल, शंकरनाथ विश्वकर्मा, विनोद राठोड, ललित सावळे, सोपनील देशमुख, पंजाब धारपवार, सोनाजी कोठे, मयूर उंडे, अंकुश तायडे, राज लव्हाले, अमर बागळे, राजू डांगे तसेच गावातील नागरिकांनी विशेष प्रयत्न केले.

## स्वाधार योजनेच्या अर्जातील त्रुटींची तात्काळ पूर्तता करण्याचे आवाहन

**बुलडाणा (महासागर प्रतिनिधी):** सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागांतर्गत राबविण्यात येणाऱ्या "भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना" अंतर्गत शैक्षणिक सत्र २०२५-२६ साठी अर्ज केलेल्या विद्यार्थ्यांनी अर्जातील त्रुटींची तात्काळ पूर्तता करावी, असे आवाहन सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, बुलढाणा कार्यालयाने केले आहे. शासकीय वसतिगृहात प्रवेशासाठी पात्र ठरलेल्या, तसेच रीतसर अर्ज करूनही प्रवेश न मिळालेल्या अनुसूचित जाती व नवबौद्ध प्रवर्गातील इयत्ता ११ वी, १२ वी आणि १२ वी नंतरच्या व्यावसायिक व बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी विविध स्तरांवरील महाविद्यालये/शैक्षणिक संस्थांमध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना भोजन, निवास व इतर शैक्षणिक सुविधांसाठी आवश्यक आर्थिक मदत देण्यासाठी ही योजना शासन निर्णय ६ जानेवारी २०१७ अन्वये सुरू करण्यात आली आहे. योजनेचा लाभ अधिकाधिक विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचावा आणि कोणताही विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहू नये, या उद्देशाने योजनेचा विस्तार तालुकास्तरावर २६ डिसेंबर २०२४ च्या शासन निर्णयान्वये करण्यात आला आहे. सदर योजनेसाठी विद्यार्थ्यांनी http://hmas.mahait.org या संकेतस्थळावर ऑनलाईन अर्ज सादर केले असून अर्जांची कार्यालयीन तपासणी सुरू आहे.

# १२ शिव ज्योर्तिलिंगांच्या भव्य दर्शन झाँकीचे उद्घाटन

**खामगाव (का.प्र.):** प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालय यांच्यावतीने महाशिवरात्रीच्या पावन पर्वानिमित्त १२ शिव ज्योतिर्लिंगांची भव्य दर्शन झाँकी आयोजित करण्यात आली आहे. ही झाँकी 'शिवालय' शिवमंदिर, मातोश्री पार्क, आदर्श नगरजवळ, बोबडे कॉलनी रोड, खामगाव येथे १३ ते १६ फेब्रुवारी दरम्यान दररोज सायंकाळी ५ ते रात्री ९ वाजेपर्यंत भाविकांसाठी खुली राहणार आहे.

या भव्य झाँकीचे विधिवत उद्घाटन १३ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ६ वाजता ब्रह्माकुमारीज सेवाकेंद्र संचालिका राजयोगिनी तपस्विनी शकुंतलादीदी यांच्या शुभहस्ते संपन्न झाले. या उद्घाटन सोहळ्यासाठी प्रमुख अतिथी म्हणून अशोक सोनोने (केंद्रीय कार्यकारिणी



सदस्य, वंचित बहुजन आघाडी), वैभव डवरे (माजी उपाध्यक्ष, नगर परिषद खामगाव), डॉ.राजेश राजोरे,सौ.हर्षदा दाते (सरपंच, ग्रामीण खामगाव) तसेच सौ.भारतीताई पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती. उद्घाटनानंतर मान्यवरांच्या हस्ते शिवपूजन व महाआरती संपन्न झाली. त्यानंतर विश्व नवनिर्माण अध्यात्मिक चित्रप्रदर्शनी तसेच परमात्मा अनुभूती कक्षाचे अवलोकन मान्यवरांनी केले.

ब्रह्माकुमारी सुषमादीदी यांनी पुष्पगुच्छ देऊन मान्यवरांचे स्वागत केले. कुमारी देविका हिने सादर केलेल्या शिवमहिमेवरील नृत्याने उपस्थितांची मने जिंकली. यानंतर मान्यवरांनी ब्रह्माकुमारीजच्या या आध्यात्मिक उपक्रमाबद्दल मनोगत व्यक्त कऊश्न आपल्या शुभेच्छा दिल्या व परिसरातील नागरिकांनी प्रतिसाद द्यावा. असे सांगितले. यावेळी आपल्या आशीर्वचनात शकुंतलादीदी म्हणाल्या की, 'देवाधिदेव भगवान शिव परमात्म्याच्या महाशिवरात्रीनिमित्त या आध्यात्मिक सोहळ्याच्या माध्यमातून नागरिकांपर्यंत परमात्म्याच्या दिव्य अवतरणाचा संदेश, त्यांच्या कार्याची माहिती तसेच सद्भावना व एकात्मतेची भावना रुजवणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे. सर्व भाविकांनी या झाँकीला अवश्य भेट द्यावी.' तसेच मातोश्री पार्क येथे १७ ते १९ फेब्रुवारी दरम्यानसायंकाळी ५ ते ६ वाजेपर्यंत निशुल्क ३ दिवसीय राजयोग मेडिटेशन कोर्स आयोजित करण्यात आला असून, सर्व इच्छुक भाविकांनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रितिका सेलारका यांनी तर आभार प्रदर्शन श्रीकृष्ण खंडारे यांनी केले. यावेळी परिसरातील शेकडो नागरिकांची व महिलांची उपस्थिती होती. कार्यक्रमानंतर १२ शिव ज्योतिर्लिंगची प्रतिकृती पाहण्यासाठी गर्दी झाली होती.

RNI NO- MAHMAR 2010/35857

Mahasagar Khamgaon (Buldhana)

Printed published and owned by Shrikrishna Tansukhdas Chandakat Arunodaya Press, Cotton Market, Nagpur-44001 Bandpublishedat Dainik Mahasagar Office Mob No 6028456887 Bhagvan Mahavir square Khamgaon Group Editor-in-Chief and Managing Director - Shrikrishna Tansukhdas Chandak, Group Editor - Sandeep Ramrao Kale, Managing Editor - Pankaj Shrikrishna Chandak. Head Office Nagpur Mob No 7447736851 9622070023 Buldana District Edition Head, Local Editor Yashwant Vinayak Pingle (Responsible for editorial as per PRB act) Mob No. 5501301404 (City Office Railway Station square, Khamgaon) Email yashwantoingle525@gmail.com

आर.एन.आय. नोंदणी क्र. मह/म/२०१०/३५८५७

महासागर खामगाव

मालक, मुद्रक, प्रकाशक : श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर, ४४००१८, येथे छापून, दैनिक महासागर कार्यालय, भगवान महावीर चौक, खामगाव येथे प्रकाशित केले. मुख्य संपादक व मॅनेजिंग डायरेक्टर : श्रीकृष्ण तनसुखदास चांडक, समूह संपादक : संदीप रामराव काळे, प्रबंध संपादक : पंकज श्रीकृष्ण चांडक, स्थानिक संपादक : यशवंत विनायक पिंगळे, फोन: ९५६१३६१४०४ (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी स्थानिक संपादकांची राहील)

